# University of Mumbai

सांख्यिकी कक्ष
दुरध्वनी क्र. ०२२-६८३२ ००५२
०२२-२२६१ ८९८७
Email : supt.statunit@gmail.com
खोली क्र २०२, दुसरा मजला,
मुंबई विद्यापीठ, फोर्ट,
महात्मा गांधी मार्ग,
मुंबई - ४०० ०३२.

**No.UDSTAT/ICD/AISHE/2019-20/ 126 of 2020**

**विषय : शैक्षणिक वर्षे २०१९-२० या वर्षाकरीता AISHE, MIS व मुंबई विद्यापीठाने विकसित केलेल्या विद्यार्थी संख्या (Students on Roll) कार्यशाळेबाबत.**

संदर्भ : १. No. UDSTAT/ICD/2019-20/ 71of 2019, १ ऑक्टोबर, २०१९.
२. No.UDSTAT/ICD/MIS/2019-20/75of 2019, १० ऑक्टोबर, २०१९.
३. No.UDSTAT/ICD/2019-20/AISHE/107of 2020, २ जानेवारी, २०२०.

---

परिपत्रक :-

ठाणे व पालघर जिल्हयातील अनुक्रमे सर्व संलग्नित महाविद्यालये यांचे प्राचार्य व विभाग प्रमुख यांचे लक्ष उपरोक्त विषय व संदर्भित पत्राकडे वेधू इच्छितो की, सदर पत्रांनुसार जिल्हयातील महाविद्यालयामधील शैक्षणिक वर्षे २०१९-२० करीता AISHE, MIS व Students on Roll बाबत ऑनलाईन सर्व्हेक्षणात्मक माहिती आपणांस दिलेल्या विहित नमुन्यात पाठविण्याची विनंती करण्यात आलेली होती.

त्याप्रमाणे काही महाविद्यालयांनी संबंधित ऑनलाईन माहिती देण्यास योग्य तो वेळेत प्रतिसाद दिला. **परंतु काही महाविद्यालयांनी अद्यापपर्यंत ती सादर केलेली नसल्यामुळे किंवा सादर केलेली असल्यास आयोजित कार्यशाळेकरीता उपस्थित राहणे गरजेचे आहे**. कारण याबाबत भविष्यात येणा-या कोणत्याही संबंधित विषयाकरीता काही अडचणी किंवा समस्या उद्भवल्यास त्याचे निरसन करून घेता येईल, त्याकरीता श्री. सागर बांदल-प्रोग्रामर, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे, तसेच श्री. दिपक वि. मोरे-नोडल अधिकारी, मुंबई विद्यापीठ व त्यांचे इतर सहकारी वर्ग आपल्या सर्वांच्या मार्गदर्शनासाठी उपस्थित राहणार आहेत. आपल्या महाविद्यालयातील नोडल अधिकारी किंवा प्रतिनिधी यांची संबंधित कार्यशाळेत उपस्थिती प्रार्थनीय/आवश्यक आहे. **त्याचबरोबर सोबत आपल्या महाविद्यालयाचा DCF-II आणि TIF forms असा Pendrive मध्ये भरलेला डाटा, एक स्वतःचा लॅपटॉप व डोंगल अशा आवश्यक गोष्टी आणाव्यात,** जेणेकरून कार्यशाळेच्या सदर दिनी आपल्या महाविद्यालयातील संपुर्ण उल्लेखित ऑनलाईन माहिती भरून घेतली जाईल व ती संचालनालयास विनाविलंब सादर करण्यास सोईचे होईल.

सदर कार्यशाळेच्या आयोजनाचे तपशिल खालीलप्रमाणे आपल्या माहितीस्तव सादर :-

| जिल्हा | दिनांक व वेळ | कार्यशाळेचे ठिकाण | दुरध्वनी क्र./ईमेल आयडी |
|---|---|---|---|
| ठाणे व पालघर | शनिवार, १५ फेब्रुवारी, २०२० रोजी सकाळी ठिक ११:०० वाजता | सोनोपंत दांडेकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, खरे कुरान रोड, जि. पालघर, पिन कोड - ४०१ ४०४. | ०२५२५ - २५२१६३/२५२३१७<br>९७६५८ ०२८६८<br>८९८३४ ९७२८२ |

उपरोक्त संक्षिप्त बाब लक्षात घेता, संबंधित कार्यशाळेसाठी उपरोल्लेखित केलेल्या सर्व गोष्टी सोबत घेवून उपस्थित राहण्याबाबतच्या सुचना आपल्यामार्फत संबंधितांना देण्यात यावेत, ही विनंती.

मुंबई - ४०० ०३२
दिनांक : ४ फेब्रुवारी, २०२०

नोडल अधिकारी,
(AISHE/MIS Cell)

---

प्रत माहितीकरिता रवाना :-

१) संचालक, शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, मध्यवर्ती इमारत, पुणे - ४११ ००१.
२) विभागीय सहसंचालक, (उच्च शिक्षण), कोकण विभाग, शासकीय अध्यापक महाविद्यालय परिसर, पनवेल, जि. रायगड - ४१० २०६.
३) स्विय सहायक, प्र. कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई - ४०० ०३२.
४) मा. प्राचार्य, सेनोपंत दांडेकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, खरे कुरान रोड, जि. पालघर, पिन कोड - ४०१ ४०४, यांच्या योग्य त्या कार्यवाहीसाठी व माहितीसाठी सादर.

Scanned with CamScanner